“महाराष्ट्रातील शासकीय ग्रंथालयामार्फत स्पर्धात्मक परीक्षेसाठी देण्यात येणाऱ्या माहितीसेवा”:—एक अभ्यास

१. प्रस्तावनाः—

आधुनिक काळात समाजाच्या गरजा/अपेक्षा हया विविधरंगी झालेल्या आहेत शिक्षण, सांस्कृतीक प्रगती, माहीती, आध्यात्मिक व तत्वचिंतन, करमणुक इ.या गरजांची पुर्ती करण्यासाठी समाजात काही संस्था निर्माण झाल्या आहेत त्यात शासकीयव सार्वजनिक ग्रंथालये ही देखील अशाच महत्त्वाच्या संस्था म्हणाव्या लागतील.

“ज्या ग्रंथालयाचा वापर समाजातील सर्व घटकांना करता येतो अशा ग्रंथालयाला शासकीय ग्रंथालय म्हणतात.” शासकीय ग्रंथालय म्हणजे असे ग्रंथालय की जे शासकीय अर्थसाहाययातून चालते या ठिकाणी सर्व स्तरातील लोक जात, धर्म असा भेदभाव न करता सर्वांसाठी ते खुले असते व ज्याठिकाणी निरंतर शिक्षणाची प्रक्रिया चालु असते.

स्वातंत्र्यानंतर शिक्षण,संशोधन, खासकरून वैज्ञानिक संशोधन, औद्योकीक प्रगती इत्यादींना प्राधान्य मिळाले. पंचवार्षिक योजनांव्दारे ग्रंथालयांना ग्रंथखरेदी व इमारती यांना वाढत्या प्रमाणावर अनुदान मिळु लागले. नवी व़िद्यापीठे, महाव़िद्यालये, संशोधन संस्था स्थापन झाल्या व त्यांची ग्रंथालये वाढू लागली.१९५२ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोग स्थापन झाले विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मिळणा—या अनुदानातून विद्यापीठ, महाव़िद्यालयीन व संशोधन ग्रंथालयांचे ग्रंथसंग्रह वाढले नव्या इमारती उभ्या राहिल्या. १९६७ मध्ये सार्वजनिक ग्रंथालय कायदा स्थापन झाला त्याव्दारे सार्वजनिक ग्रंथालयांना चालना मिळाली यामध्ये प्रत्यक्ष कर न भरता ५०० लोकसंख्या असणा—या खेडयापडयापर्यंत ग्रंथालय सेवा देण्याची तरतुद सार्वजनिक ग्रंथालय कायदयामध्ये आली. या सर्व प्रक्रीयेसाठी स्वतंत्र संचालनालय स्थापन करण्यात आले असुन सल्ला देण्यासाठी राज्य ग्रंथालय परिषदेची स्थापना करण्यात आली. शिक्षण मंत्री आणि उपशिक्षण मंत्री हे या परिषदेची पदसिध्द अध्यक्ष व उपाध्यक्ष आहेत.

शासकीय ग्रंथालयेव्दारे स्पर्धापरिक्षेची तयारी करणा—या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्यवृत्तपत्रे, मासीके, ग्रंथ, ग्रंथेत्तर साहित्य तसेच बसण्यासाठी टेबल, खुर्ची, पाण्याची सोय करुन विद्यार्थ्यांना मदत करत असतात.

२. पुर्व साहित्याचा शोध—

शासकीय ग्रंथालयाचा मुख्य उददेश हा समाजासाठी आहे. या ग्रंथालयामध्ये धर्माच्या, जातीच्या भींती नसतात सर्वांना समान स्वरूपात सेवा पुरवली जाते. शासकीय ग्रंथालयातील वाचन संग्रहाचा उपयोग करण्याचा अधिकार समाजातील सर्वांनसाठी समान आहे. यावरून शासकीय ग्रंथालय हे एक सामाजिक संस्था आहे. राज्यशासनाने समाजाच्या उपयोगासाठी निर्माण केलेल्या व स्वत: चालवलेल्या शासकीय मध्यवर्ती ग्रंथालय तसेच शासकीय विभागीय ग्रंथालय, शासकीय जिल्हा ग्रंथालये यांच्या माध्यमातुन राज्यातील ग्रंथाचा संग्रह

करून कायमस्वरूपी एक सांस्कृतिक ठेवा राष्ट्रीय संपत्ती म्हणून जतन करणे आणि आवश्यकतेनुसार जनतेला उपलब्ध करून देण्याचे कार्य केले जाते.

समाजामध्ये शिक्षण व साक्षरतेचे प्रमाण वाढण्यासाठी प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी शासकीय ग्रंथालयाची स्थापना महाराष्ट्रात करण्यात आली आहे. त्यानुसार महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हयासाठी एक शासकीय जिल्हा ग्रंथालय स्थापन करण्यात आली आहेत.

ग्रंथालये ही माहीती सेवा केंद्रे आहेत. संदर्भ सेवा, देवघेव सेवा, आंतरग्रंथालयीन देवघेव, भाषांतर सेवा, अंधासाठी ब्रेन लीपी,झेरॉक्स सेवा, इ. सेवा वाचकांला व्हाव्यात व त्यांच्या गुणवत्तेत वाढ कशा प्रकारे करता येईल याचा शोध घेण्यासाठी सदर संशोधन प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

३. स्पर्धोत्मक परीक्षेबाबत :—

प्रशासकीय सेवेमध्ये मिळणारा मान, सन्मान त्याची भुरळ आजच्या तरूण वयातील मुलांना पडलेली आपण पाहत आहोत. या स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे मुले बहुतांश ग्रामीण भागातील आहेत. ही तरूण मुले सध्या शहरांकडे येऊ लागले आहेत. या ग्रामीण भागातील गरीब, कष्टकरी शेतक—यांच्या मुलांचा त्यांच्या कष्टाचे चिज करण्यासाठी त्यांनी पाहीलेली स्वप्ने पूर्ण करण्यासाठी जिल्हा, तालुका शासकीय ग्रंथालये तसेच अ दर्जा प्राप्त सार्वजनिक ग्रंथालये ही बहुमोल मदत करताना दिसतात नव्हे अश्या विद्यार्थ्यांच्या यशात सिंहाचा वाटा आहे. आपन आज पाहत आहोत की स्पर्धा परीक्षमध्ये प्रचंड स्पर्धा निर्माण झालेली आहे. या स्पर्धेत टीकण्यासाठी शालेय व महाविद्यालयीन जिवनापासून तयारी करावी लागते. स्पर्धापरीक्षा म्हणजे प्रशासणात येण्याचा राजमार्गच म्हणावा लागेल. केंद्रीय लोकसेवा आयोग, महाराष्ट्रलोकसेवा आयोग, बॅकींग परीक्षा, रेल्वे भरती, शिक्षकपदभरती व सर्व शासकीय परीक्षा या सारख्या स्पर्धा परीक्षार्थींना अभ्यास करताना येणा—या अडचनी ही ग्रंथालये वेगवेगळया सोयीसुविधा देऊन दुर करतात.

४. <u>संशोधन विषयाची निवड :—</u>

आजच्या संगणकयुगामूळे शासकीय ग्रंथालये ही अधिक माहीतसंपन्न झालेली आहेत. अलीकडच्या काळात प्रशासकीय सेवेत येण्यासाठी विविध मार्गदर्शन वर्ग, शिकवण्या घेतल्या जातात तसेच विद्यार्थी ग्रंथालयामध्ये तासंन—तास अभ्यास करताना दिसत आहेत. त्यांना पुरविल्या जाणा—या किंवा देण्यात येणा—या सेवा कश्या आहेत? त्या कश्या पुरवल्या जातात त्यामध्ये कसे बदल होत गेले? स्पर्धात्मक परीक्षेची तयारी करणा—या विद्यार्थ्यांना येणा—या अडचणी कोणत्या? स्पर्धात्मक परीक्षेची तयारी करणा—या विद्यार्थ्यांची आर्थिक परीस्थिती कशी आहे? शासकीय ग्रंथालयामार्फत देण्यात येणा—या सुविधा कोणत्या? ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शासकीय ग्रंथालयाचे फायदे होतायत की नाही? इ. अनेक प्रश्नाचे शोध घेण्यासाठी **"महाराष्ट्रातील शासकीय ग्रंथालयामार्फत स्पर्धात्मक परीक्षेसाठी देण्यात येणा—या माहितीसेवा":—एक अभ्यास**. या विषयाची संशोधनासाठी निवड करण्यात आलेली आहे.

५. समस्या विधान–

“महाराष्ट्रातील शासकीय ग्रंथालयातर्फे स्पर्धात्मक परीक्षेसाठी देण्यात येणा–या माहितीसेवा –एक अभ्यास’’

६. संकल्पनाचे विश्लेषण

६.१ महाराष्ट्र –

महाराष्ट्र हे भारतातली क्षेत्रफळाच्या दृष्टीने तिसरे व लोकसंख्येच्या बाबतील दुसरे मोठे राज्य आहे. वैभवशाली आणि महान यादव मराठी साम्राज्याची स्थापना याच महाराष्ट्रात झाली. इसवी सन १४०० पूर्वी हजारो वर्षे महाराष्ट्रावर मगद,वाकाटक,राष्टकुट,सातवाहन, चालूक्य, यादव या सारख्या मातब्बर मराठेशाहीतील मराठी लोकांचे राज्य होते तेराव्या शंतकात महाराष्ट्र मुस्लिम राजवटीखली अल्लाहुदीन खिलजी,मुहम्मद बिन तुघलक यांची सत्त होती.१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. महाराष्ट्राची राजधानी मुंबई व उपराजधानी नागपुर आहे महाराष्ट्रात ३६ जिल्हाचा समावेश होतो महाराष्ट्राचे सध्याचे प्रमुख भौगोलीक विभाग कोकण,मराठवाडा,पश्चिम महाराष्ट्र, दक्षिण महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, विदर्भ एकत्र करुन मराठी भाषीक महाराष्ट्राची रचना करण्यात आली आहे. देवगिरीचे यादव हा ऐतिहासिक काळ महाराष्ट्राच्या राजकीय उत्कार्षाचा काळ होता.(https://mr.wikipedia.org/)

महाराष्ट्रातील ग्रामीण व शहरी भागातील विदयार्थी लोकसेवा आयोग राज्यसेवा व इतर स्पर्धा परिक्षेची पुर्व व मुख्य परीक्षेची सर्वाधिक तयारी महाराष्ट्रातुन केली जाते त्यासाठी सार्वजनिक ग्रंथालय व शासकीय ग्रंथालय स्पर्धा परिक्षेच्या तयारीसाठी ग्रंथ व मासिके पुरविण्याचे कार्य करतात

६.२ शासकीय आणि सार्वजानिक ग्रंथालय –सन १९६२ मध्ये युनेस्कोने सार्वजानिक ग्रंथालयाची परिपूर्ण व्याख्या ‘‘ सार्वजानिक ग्रंथालय म्हणजे असे ग्रंथालय की जे सार्वजनिक निधी, शासकीय अर्थसाहाय्यातून चालते व या ठिकाणी कोणत्याही पुरूष, स्त्री, जात, धर्म असा भेदभाव न करता सर्वांना खुंले असते व ज्या ठिकाणी निरंतर शिक्षणाची प्रक्रिया सतत चालू असते’’

राज्यात एकूण ३५ जिल्हयात शासकीय जिल्हा ग्रंथालये कार्यरत आहेत. या ग्रंथालयातर्फे व्यक्तिसभासदत्व देण्यात येते. शालेय ग्रंथालयांना तसेच ग्रामपंचायतींना शैक्षणिक वाचनाची आवड निर्मीण करण्यासाठी ग्रंथ प्रदर्शनासारख्या सांस्कृतिक कार्यकामंध्ये आयोजन केले जाते. भारत सरकारच्या ग्रंथालय विकास योंजनेअंतर्गत १९५५ मध्ये तत्कालीन मध्यप्रांतामधील विदर्भाच्या आठ शासकीय जिल्हा ग्रंथालये स्थापन करण्यात आली. १९९६ मध्ये नाशिक, औरंगाबाद, मुंबई, पुणे विभागामधील प्रत्येक जिल्हासाठी एक शासकीय जिल्हा ग्रंथालय स्थापन करण्यात आले. १९९८ पासून जालना, नशिक, धुळे, रत्नागिरी, रायगड, ठाणे, पूणे आणि कोल्हापूर या जिल्हयांच्या मुख्यालयात ही ग्रंथालये स्थापन करण्यात आली आहेत. १मे २००५ पासून मुंबई शहर, सातारा, बीड आणि नांदेड याठिकाणी स्थापन करण्यात आले आहेत. (https://mr.wikipedia.org)

६.३ स्पर्धात्मक परीक्षा—राज्य शासन किंवा केंद्र शासन रिक्त पदे आणि गरजे अनुसार पदभरती करत असत. योग्य उमेदवार निवडण्यासाठी जी परीक्षा घेतली जाते तिला स्पर्धा परीक्षा असे म्हणतात. प्रत्येक पदाकरिता या स्पर्धा परीक्षेचे स्वरूप तयार केले जाते. शासनाच्या प्रत्येक विभागातील पदभरती साठी त्या त्या विभागात युपीएससी,एमपीएससी, स्टाफ सिलेक्शन, बॅंकिंग, रेल्वे, पोस्ट इत्यादी स्पर्धा परीक्षा असल्यास प्रत्येक परीक्षेचा अभ्यासक्रम सर्वात परिपूर्ण सर्वसमावेशक असा असतो. (https://www.khasmarathi.com/)

६.४ माहितीसेवा—

माहिती उत्पादने प्रदान करून वापरकर्त्याची माहिती आवश्यक असलेल्या हि एक सेवा आहे. दुस—या शब्दात एक माहिती सेवा ही माहिती उत्पादनांची प्राप्ती आणि प्रदान करणे. एक संकीर्ण अर्थाने, माहिती सेवेला संगणक प्रणाली म्हणता येइल. माहिती सेवा हा माहिती प्रणालीचा हा भाग आहे जो ग्राहकांना डेटा,ज्ञान, माहिती प्रदान करतो आणि प्रशासनकाद्वारे वैक्लपिकरित्या व्यवस्थापित आणि संचयित करण्यासाठी त्याच्या सहाय्यकांकडून संकलित करतो. माहिती सेवांमध्ये संघ जागरूकता सेवा आणि अशा इतर सेवांचा समावेश आहे. माहिती सेवेचा शब्दावली अर्थ असा आहे'' मागणीच्या अपेक्षेने ग्रंथालय किंवा माहिती विभागत माहिती असलेल्या माहितीकडे लक्ष वेधून घेणारी खास वाचनालय द्वारा प्रदान केलेली सेवा हे वृत्तपत्रे, साहित्य सर्वेक्षण, वाचन, सारांश, वर्तमान, नियतकालिकातील लेखांचे तपशील इत्यादी तयार करून प्रसारित करून केले जातात. जे अपेक्षित आहे. सेवेच्या संभाव्य वापरकर्त्यांसाठी हे हितकारक असेल'' जरी माहिती सेवांचा शब्दाकोश अर्थ एखाघा विशेष ग्रंथालयतर्फे प्रस्तुत केला जातो ही कल्पना देते, परंतु या सेवा या पुढे विधापीठाच्या ग्रंथालयांपुरती मर्यादित नाहीत. या सेवा आता उच्च आणि व्यावसायिक शैक्षणिक संस्थांच्या ग्रंथालय उपलब्ध आहेत.

७. संशोधन विषयाचे महत्व

महाराष्ट्रात पर्जन्यमान अतिशय कमी असल्यामुळे येथे कायम दुष्काळ जंन्य परिस्थिती असते. येथील शेती ही पावसाच्या पाण्यावर अवलंबुन असते बहुतांश लोकांचा उदरनिर्वाह हा शेतीवर चाललेला असतो. या अशा ग्रामीण भागातुन भूमीहीन बेकार व अत्यंत गरीब परीस्थितीतुन इथला तरूण हा मोठी उद्दिष्टये डोळयासमोर ठेवुन तो शहरी भागामध्ये स्पर्धापरीक्षेची तयारी करण्यासाठी येत असतो. या स्पर्धापरीक्षेची तयारी करताना त्यांचा संबंध हा त्या शहरामधील शासकीय व सार्वजनिक ग्रंथालयाशी येतो. बहुतांश प्रशासनातील अधिका—यांच्या यशात या शासकीय ग्रंथालयाचा खुप मोठा वाटा आहे. व त्यामुळे स्पर्धात्मक परीक्षादेणा—या विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणा—या माहितीसेवा यांचे महत्त्व वाढताना दिसत आहे.

८. संशोधन विषयाचे उद्दिष्टये:—

प्रस्तुत, संशोधन अभ्यासाविषयी काही उद्दिष्टये निश्चित करण्यात आली आहेत.

- महाराष्ट्रातील शासकीय ग्रंथालयांची सध्या स्थिती जाणुन घेणे.
- महाराष्ट्रातील शासकीय ग्रंथालये देत असलेल्या स्पर्धापरीक्षेबाबत सेवांचा अभ्यास करणे.
- शासकीय ग्रंथालयांना पुरवण्यात येणाऱ्या शासकीय धोरणांचा अभ्यास करणे.
- स्पर्धा परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे मत जाणुन घेणे.

९. संशोधनाची गृहीतके :—

१. महाराष्ट्रातील शासकीय ग्रंथालयामध्ये देण्यात येणा—या माहितीसेवेमध्ये आधुनिकता येत आहे.

२. प्रशासकीय सेवेमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये शासकीयग्रंथालयांचा सिंहाचा वाटा आहे.

३. स्पर्धात्मक परीक्षा देणा—या विदयार्थ्यांच्या समस्येमध्ये बदल होत आहे.

४. शासकीय ग्रंथालयांना पुरवण्यात येणा—या शासकीय योजनांमध्ये बदल होत आहे

१०. व्याप्ती व मर्यादा :—

सदर संशोधनाची व्याप्ती महाराष्ट्र राज्यापुर्ती मर्यादीत असुन त्यात ही संशोधनाची मर्यादा ही सन.२०१२ ते २०२२ या कालखंडापुरती मर्यादीत असेल.

११.संशोधन पध्दती :—

“महाराष्ट्रातील शासकीय ग्रंथालयातर्फे स्पर्धात्मक परीक्षेसाठी देण्यात येणा—या माहितीसेवा”:— एक विश्लेषणात्मक अभ्यास या विषयांच्या संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला जाणार आहे. प्रस्तुत विषयाच्या अध्यनाकरीता तथ्य संकलनासाठी प्राथमिक व व्दितीय सामग्रीचा आधार घेण्यात येणार आहे.

११.१. प्राथमिक सामग्री/नमुना निवड:—

यामध्ये महाराष्ट्रातील शासकीय ग्रंथालयाची अनुसूचीव्दारे(प्रश्नावली), प्रत्यक्ष मुलाखत घेऊन व प्रत्यक्ष निरीक्षणाव्दारे माहितीचे संकलन केले जाणार आहे. महाराष्ट्रातील ३५ जिल्हयातील शासकीय ग्रंथालयामध्ये निवडण्यात येणार आहेत त्यासाठी प्रश्नावली, मुलाखत, प्रत्यक्ष निरक्षण इ. साधन पध्दतीचा वापर केला जाईल.

११.२ दुय्यम सामग्री:—

यामध्ये अभ्यास विषयाला अनुसरून ग्रंथ, लेख, मासिके, दैनिके, इंटरनेट, प्रकाशित व अप्रकाशित अहवाल इ. माहितीचे संकलन केले जाईल.

१२. प्रकरणे :–

<u>प्रकरण १.</u>

प्रस्ताविक :– प्रस्तुत प्रकरणात शासकीय ग्रंथालयाची पार्श्वभुमी, तसेच तेथे देत असलेल्या माहिती सेवा पध्दतीचा आढावा घेण्यात येईल.

<u>प्रकरण २.</u>

पुर्वसाहित्याचा शोध :– प्रस्तुत प्रकरणात व शासकीय ग्रंथालयामार्फत देण्यात येणा–या माहितीसेवा या घटकांचा ज्या विविध संशोधकांनी अभ्यास केलेला आहे, तसेच शासकीय ग्रंथालयाबाबत असलेले विविध धोरण, शासकीय अहवाल त्याचा थोडक्यात आढावा घेण्यात येईल.

<u>प्रकरण ३.</u>

शासकीय ग्रंथालाये व माहीती सेवा :–या प्रकरणात महाराष्ट्रातील ३५ जिल्हयातील शासकीय ग्रंथालयाची सर्वसामांन्य माहिती तसेच लोकसंख्या, शिक्षण, शासनाच्या विविध योजना व कायदे इ. बाबतचा आढावा घेण्यात येईल.

<u>प्रकरण ४.</u>

माहिती संकलन विश्लेषण आणि सादरीकरण :– या प्रकरणात महाराष्ट्रातील स्पर्धात्मक परीक्षेची तयारी करणा–या विद्यार्थ्यांचा अभ्यास करण्यात येईल.

<u>प्रकरण ५. निष्कर्ष, शिफारशी ंआणि संशोधनाच्या पुढील दिशा</u> :–या प्रकरणात संशोधन विषयांचे अभ्यासातुन काढलेले निष्कर्ष व त्याअनुषंगाने केलेल्या शिफारशींचा व उपायांचा समावेश करण्यात येईल.

<u>संदर्भः–</u>

1. Agarwal Chetan ,Sharma Vijay,(2012),Research methodology in libraryscience,commonwealth publishers pvt.ltd.,New Delhi.pp-23.
2. Ahuja Ram, (2002), Research method, Rawat publication, jaipur.
3. Allen Kent, (1984), Encyclopedia of library and information science, Harper press, New York.
4.Harper press, New york.
5. Gov.of India, (2009) National knowledge commision. Report National New Delhi
6. Gov. of India, (2012), National Mission on Libraries. Report to the Nation.
7. Information books, (2016) district library officers office, Parbhani, pp-55-58
8. National Knowledge commission, Report to the nation. New Delhi:NKC,2009.p1
9.National Mission on Libraries, Report to the Nation, NMl,2012.p1-2
10. Kale Kishor (2010),Information services and resource 1st ed.Nagpur, Vishva publisher and distributer's p-1-102
11. Kumbhar B.D. Lamani Manohar,A case study of government district libraries information technology essay,pp-2

12. Laugesen amamda, (2014) UNESCO and the Globalization of the public library of idea,1948 to1965, library and information history, vol.30pp-1
13. http://nmlindia.nic.in.retrived on dated 10 June 2021
14. http://dol.maharashtra.gov.in retrieved on dated on 5 June 2021
15. http://letestlaws.com retrieved on dated 15 June 2021.
16. http://ifla.org retrived on dated 5 June 2021
17. https://en.m.wikipedia.org retrived on dated 20 June 14.2021
18. https://www.uniassignment.comretrieved on dated 5 June 2021.
19. https://www.khasmarathi.com/2020/05/mpsc-exam-preparation.html retrieved on dated 2 June 2021.
20. वीर, डी. के., २००६,RRRLF: सार्वजानिक ग्रंथालयांसाठी वरदान, ज्ञानगंगोत्री अंक क्र. १, नाशिक, य.च.म.मु.वि.,पृ. २९–३६.
21. मठकर, जयानंद, २००२, सार्वजनिक ग्रंथालय : काही विचार, ज्ञानगंगोत्री अंक क्र. १, नाशिक, य.च.म.मु.वि.,पृ.३६.

❖ परीष्टे

अ. शासकीय ग्रंथालयाच्या यादया.
ब. शासणाचे अहवाल व कायदे.

संशोधक — मार्गदर्शक

श्री.दत्ता अंकुशराव पवार — डॉ. रामेश्वर सुर्यभानजी पवार